निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२३/अपील/०२/२०२३/०२६१ दिनांक-०५.०६.२०२३

माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक :२०.०२.२०२३
जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक:१७.०३.२०२३
प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक :१९.०४.२०२३
प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक :०५.०६.२०२३

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

<u>अपील क्र. ०२/२०२२</u>

<u>अपीलकर्ता:</u> श्री. चंद्रकांत मोहन येशीराव

<u>विरुदध</u>

<u>प्रतिवादी :</u> जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**<u>अपीलाचे तथ्य :-</u>**

१) अपीलकर्ता यांनी दिनांक १७.०२.२०२३ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक २०.०२.२०२३ रोजी प्राप्त झाला. अपीलार्थी यांच्या दिनांक १७.०२.२०२३ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक माहिती न पुरविल्यामुळे अपीलार्थी यांनी दिनांक १७.०२.२०२३ रोजी वरील अपील दाखल केले. (प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक २०.०२.२०२३ रोजी प्राप्त झाले.)

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक १९.०४.२०२३ रोजी नोटिस पाठवून दिनांक २७.०४.२०२३ रोजी आयोजीत केली होती परंतू, अपिलार्थी यांनी दिनांक २५.०४.२०२३ रोजी ई-मेलद्वारे काही अपरिहार्य कारणामुळे/काही अडचणीमुळे सदर सुनावणीस हजर राहणे शक्य नसल्याने सुनावणी पुढे ढकण्यात येवून सदर सुनावणी ही "ऑनलाईन/ई-सुनावणी" पध्दतीने आयोजीत करण्याची विनंती केली होती, त्यानुषंगाने सदर सुनावणी पुढे ढकलण्यात येवून पुन:श्च "ऑनलाईन/ई-सुनावणी" पध्दतीने दिनांक १०.०५.२०२३ (बुधवार) रोजी आयोजीत करण्यात आली. ई-सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोन्ही हजर होते. अपिलार्थी व माहिती अधिकारी यांनी मौखिक व लेखी निवेदन सादर केले.

३) **अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहेत -**

**मागितलेली माहिती:-**

i. दिनांक २१/१२/२०२२ रोजी सी.पी.ओ. मेंबर नाशिक झोन साठी घेण्यात आलेल्या मुलाखतीत सहभागी असलेले, मुलाखतीसाठी उपस्थित झालेले व मुलाखत दिलेल्या अर्जदारांचे नाव, पत्ता, व्यवसाय, शैक्षणिक पात्रता संबंधी संपुर्ण माहिती व त्यांनी मे. आयोगाकडे सादर केलेल्या तसेच एम.एस.डी.सी.एल. कडे सादर केलेल्या प्रस्तावाचे प्रमाणित सत्य प्रतीलिपी मिळणेबाबत.
ii. मुलाखती अंती सर्व उमेदवारांना मिळालेला गुणानुक्रम बाबत संपुर्ण कागदपत्रे मिळावीत.
iii. अर्जदारांनी दाखल केलेल्या प्रस्तावानुसार मिळालेला गुणानुक्रम व गुण बाबत संपुर्ण माहिती व कागदपत्रे मिळावी.
iv. अर्जदारांनी दिलेल्या मुलाखतीनुसार मिळालेला गुणानुक्रम व गुण बाबत संपुर्ण माहिती मिळावी.
v. मुलाखती अंती पात्र, अपात्र, प्रतीक्षा यादी बाबत संपुर्ण माहिती व कागदपत्रे मिळावी.
vi. मुलाखतीचे ऑडिओ व व्हिडिओ रेकॉरडिंग मिळावेत.
vii. मुलाखत घेणाऱ्या व्यक्तींचे नाव, पद, माहिती मिळावी.
viii. मुलाखत घेणाऱ्या प्रत्येक सन्माननिय अधिकारी, पदाधिकारी यांनी वैयक्तिक रित्या प्रत्येक उमेदवारास दिलेल्या गुणानुक्रमांकाच्या नोंदी मिळणेबाबत.
ix. निवड समितीने उमेदवार निवडतांना लावण्यात आलेले निकष याबाबत संपुर्ण माहिती व कागदपत्रे मिळावीत.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-**

माहिती अधिकार अर्ज दिनांक १७.०२.२०२३ मध्ये मागीतलेल्या माहितीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर-

**वरिल मुद्दा क्रमांक (i) ला दिलेले उत्तर :-**

आपण विचारलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (१) (त्र) अंतर्गत असल्यामुळे उपलब्ध करता येत नाही.

**वरिल मुद्दा क्रमांक (ii), (iii), (iv), (vii), (viii) व (ix) ला दिलेले उत्तर :-**

सदर माहितीचा काही भाग हा माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (१) (त्र) अंतर्गत समाविष्ट असलेल्या माहितीशी संबंधीत असल्यामुळे, उर्वरीत भाग redacting स्वरूपात सोबत जोडलेला आहे. (एकूण पृष्ठ ०३)

**वरिल मुद्दा क्रमांक (v) ला दिलेले उत्तर :-**

निवड झालेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहे.

**वरिल मुद्दा क्रमांक (vi) ला दिलेले उत्तर :-**

संबंधित माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध नाही.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-**

*माहिती चुकिची व दिशा भुल करणारी दिली.*
*कायद्याचा चुकीचा अर्थ लावुन माहिती नाकारण्यात आली आहे.*

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-**

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना एकूण त्यांनी माहिती मागितलेल्या ९ मुद्यांपैकी मुद्दा क्रमांक ५ व ६ यांची माहिती दिलेली आहे, परंतू मुद्दा क्र. १ ची माहिती माहितीचा अधिकार, २००५ च्या कलम ८(१)(त्र) नुसार येत असल्याचे नमूद करून नाकारली आहेत व अंशत: माहिती उपलब्ध करून /redacting करून उपलब्ध करून देण्याचे म्हटले आहे.

माहितीचा अधिकार, २००५ चे कलम ८(१)(त्र) खालीलप्रमाणे आहे -

"*कलम ८ (१) --------*

**(त्र) जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी, यथास्थिती, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याची, राज्य जन माहिती अधिकाऱ्याची किंवा अपील प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल, ती खेरीजकरून, जी प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधांशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप करील, अशी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती :**

**परंतु, जी माहिती संसदेला किंवा राज्य विधानमंडळाला देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यासही नकार देता येणार नाही."**

*माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या खालील प्रस्तावनेचे/भूमिकेचे अवलोकन करणे आवश्यक आहे.*

*माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००२ चा अधिनियम क्रमांक २२):- "प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने, सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाखालील माहिती नागरिकांना मिळवता यावी म्हणून, नागरिकांच्या माहिती मिळण्याच्या अधिकाराची व्यवहार्य शासन पध्दत आखून देण्याकरिता, केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग घटित करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.*

*ज्याअर्थी, भारताच्या संविधानाद्वारे लोकशाही गणराज्याची स्थापना करण्यात आलेली आहे;*

*आणि ज्याअर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी तिच्या कार्यशीलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासने व त्यांच्या यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत;*

*आणि ज्याअर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटनामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच, शासनांचे कामकाज कार्यक्षमरीत्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनीयता राखणे, या बाबींनाही बाध येण्याची शक्यता आहे;*

*आणि ज्याअर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्चता कायम राखताना, या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे;*

*त्याअर्थी, आता, माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विवक्षित माहिती पुरविण्याकरिता तरतूद करणे इष्ट आहे;*

*भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमीत होवो. "*

म्हणजेच सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करणे व्यापक दृष्टीकोन आहे.

दुसरे म्हणजे, माहितीचा अधिकार हा नागरिकांना दिलेला आहे, जरी माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद माहिती अधिकाराच्या कलम ८ मध्ये दिलेले असले तरी, ते माहिती अधिकाराच्या प्रस्तावनेसह/भूमिकेसह अमलात आणणे गरजेचे आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे आदेशात जरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(१)(त्र) नमूद करून, अपिलकर्ते यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करून देता येत नाही म्हटले आहे, त्या नमूद ८(१)(त्र) कलमाचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे, त्याची योग्य प्रमाणे खात्री करून घेणे आवश्यक आहे, ती खरच खाजगी बाबीत हस्तक्षेप करणारी आहे का? याविषयी माहिती अधिकारी यांनी त्यांच्या आदेशात कुठेही कारणमिमांसा केलेली नाही, फक्त कलम ८(१)(त्र) अन्वये माहिती नाकारली आहे.

**कलम ८(१)(त्र) च्या परतूंकाचे अवलोकन केले असता, जी माहिती संसेदेला किंवा राज्य विधान मंडळाला देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यास नकार देता येणार नाही.**

माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.१६.०५.२०२३ च्या निवेदनात M. Vascintha Sameeksha **versus** CPIO, Rashtriya Sankruit Sansthan मा. CIC यांनी दि.७.०४.२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशातील प्रमाण/बाबी नमूद केल्याचे स्पष्ट केले असले तरी, त्याविषयी त्याच्या आदेशात कुठेही उल्लेख नाही व ते त्यांनी अपिलार्थी यांना कळविले नाही.

सदर आदेशात २२ बाबी वर माहिती मागितल्याचे दिसून येत आहे, त्यापैकी वैयक्तिक बाबींचे प्रकटन करण्यास किंवा उपलब्ध न करण्याचे नमूद आहे, ती मुद्दा क्रमांक १,२,३,४,५,६,८,१२,१६,१९,व २१ अन्यथा इतर मुद्यांवर माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

या प्रकरणात/अपिलात, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती वैयक्तिक स्वरूपाची नसून ती व्यक्तीच्या खाजगी बाबतीत आगंतूक हस्तक्षेप करील अशी नाही. करिता वरील, आदेश या अपिलात लागू नाही.

**तसेच केंद्रीय माहिती आयोगाचे निर्णय क्र.३५४/आयसी(ए)/२००६, १३ नोव्हेंबर, २००६, युपीएससी परीक्षेचे कट ऑफ मार्कस देणे नुसार :-**

> *"शिव शंभु व इतर, संजीवकुमार व इतर वि. युपीएससी - या प्रकरणी अर्जदाराने युपीएससीकडे नागरी सेवा (पूर्व) परिक्षेच्या वैकल्पिक व सामान्य अध्ययन या विषयाचे कट ऑफ मार्क्स प्रत्येक प्रवर्गनिहाय प्रत्ये विषयाचे कट ऑफ मार्क्स आणि सर्व विषयांच्या प्रश्नांची मॉडेल उत्तरे माहिती अधिकार कायद्याखाली मागितली होते. परंतु युपीएससीच्या माहिती अधिकाऱ्याने, सदर माहिती अत्यंत गोपनीय व ती आयोगाची बौध्दीक संपदा आहे आणि अशी माहिती उघड केल्याने कोणतेही जनहित साध्य होत नाही आणि माहिती उघड केल्याने, आयोगाकडून घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेची सचोटी व क्षमता धोक्यात येईल या कारणावरून माहिती नाकारली. पहिल्या अपील प्राधिकाऱ्याने देखील ही माहिती नाकारली.*
>
> *या प्रकरणी, केंद्रीय माहिती आयोगाच्या पूर्णपीठाने १३ नोव्हेंबर, २००६ रोजी असा निर्णय घेतला की, आयोगाने सर्व विषयांचे नेमून दिलेले मार्क्स तसेच कट ऑफ मार्क्स उघड करावे आणि जर कट ऑफ मार्क्स निश्चित केलेले नसतील तर, उमेदवाराची चाळणी करताना अल्पसूचीत (शॉर्ट लिस्ट) घेतलेल्या*

*उमेदवारांचे मार्क्स उघड करावे आणि गुण मापनपध्दती उघड करण्यास सांगितले. कारण हया गोष्टी जनहिताच्या आहेत.*

*युपीएससीने या आदेशाविरूध्द दिल्ली उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केले. या प्रकरणी, आयोगाने असा निर्णय दिला की, युपीएससीने माहिती अधिकार कायद्याच्या कलम ८(१)(ड) चा घेतलेला आधार पूर्णत: अनुचित आहे. पहिले म्हणजे, अर्जदाराने मागितलेली माहिती 'बौध्दिक संपदा' या संज्ञेखाली येत नाही. काहीही झाले तरी, युपीएससी ही सार्वजनिक संस्था असल्याने तिने न्याय्य व पारदर्शकपणे काम केले पाहिजे आणि ही माहिती उघड केल्यामुळे युपीएससीच्या संरक्षित हितसंबंधापेक्षा जनहित हे अधिभावी आहे."*

वरील कारण मिमासेवरून, अपिलार्थी यांचे अपील मान्य करण्यात येत आहे. माहिती अधिकार अर्जातील मुद्दा क्र. ७ च्या संबंधाने मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीचे नांव, पद वगळता तसेच मुद्दा क्र. ८ च्या संबंधाने पदाधिकाऱ्याची त्यावर नावे असल्यास ती वगळता अपिलार्थी यांना मुद्दा क्र. १ ते ४ तसेच ९ व ५ या मुद्यानुसार आयोगातील कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करून देण्यात यावी. सदरहू माहिती, ही या निर्णयाच्या ७ दिवसांच्या आत उपलब्ध करून देण्यात यावी.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

**<u>निर्णय</u>**

**अपील मंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.**

**अपिलार्थी यांना सदर माहिती या निर्णयाच्या ७ (सात) दिवसांच्या आत उपलब्ध करून देण्यात यावी.**

5/6/2023

(अनिलकुमार उके)
संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी

प्रति,
श्री. चंद्रकांत मोहन येशीराव,
नरीमन पारशीची चाळ,
रेल्वे स्टेशन रोड, धुळे-४२४००१.
मो.नं. ९४२२७८९६४२

5/6/2023

(अनिलकुमार उके)
संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी